**मे.उटी स्टोन क्वॉरी क्लस्टर प्रोजेक्ट, उटी, हळदगांव, परसोडी, सायकी, पारडगांव व मासलकुंड, ता.उमरेड, जि.नागपूर येथील २०५.९७ हेक्टर क्षेत्रावरील १६ दगड खदानीच्या (एकुण प्रकल्प क्षेत्र—५९ हेक्टर) प्रस्तावीत प्रकल्पाची दि. २९/०४/२०२५ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त.**

*******

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ अन्वये उटी क्लस्टर बसाल्ट स्टोन/रॉक क्वॉरी (१६ प्रस्तावित प्रकल्प), स्थित गांव उटी, हळदगांव, परसोडी, पारडगांव, मासलकुंड व सायकी, ता.उमरेड, जि.नागपूर येथील २०५.९७ हेक्टर क्षेत्रावरील प्रस्तावित १६ दगड खदानीच्या (एकुण प्रकल्प क्षेत्र – ५९ हेक्टर):

| अ. क्र. | कोड | प्रकल्प प्रस्तावक | खसरा क्र. | गांव | प्रस्तावित क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पी-१ | श्री. मनिराम यादव | ११४ | हळदगांव | ७.५० |
| २ | पी-२ | श्री. अजय जेस्वानी | २०९/१, २०९/२ | हळदगांव | ३.१५ |
| ३ | पी-३ | श्री. संजय तिडके, श्रीमती कविता तिडके व श्रीमती ज्योती तिडके | ३१/१, ३७/२ | हळदगांव | ३.५१ |
| ४ | पी-४ | श्री .संजय तिडके व श्रीमती कविता तिडके | ४४/२, ४४/४ | हळदगांव | ३.६३ |
| ५ | पी-५ | श्री. दिलीप मधुकर सांबारे | ६१ (पी) | हळदगांव | २.८५ |
| ६ | पी-६ | श्री.विशाल अजय जेस्वानी, श्री संदेश जेस्वानी व श्रीमती कनक जेस्वानी | ८१(पी), ८२/२(पी), ८३(पी), ८९/२ व ८९/४(पी) | हळदगांव | ४.२५ |
| ७ | पी-७ | श्री.मयुर मुसळे | ९६ | उटी | ४.९२ |
| ८ | पी-८ | श्री.अमोल पिल्लारे | १५४, १५५ | पारडगांव | ४.४७ |
| ९ | पी-९ | श्री.अश्वीन मेहता व श्री.अरविंद मेहता | १४९(पी),१४७/१,१४७/२ | पारडगांव | ४.० |
| १० | पी-१० | श्री.तेजिंदरसिंह जस्सल | २४ | मासलकुंड | १.३० |
| ११ | पी-११ | श्रीमती.प्रतिभा कन्हेरे | २३ | मासलकुंड | १.७६ |
| १२ | पी-१२ | श्री.राहुल यादव | १२६ (पी) | परसोडी | ३.७० |
| १३ | पी-१३ | श्री.राहुल यादव | १३०/१,१३०/२ | परसोडी | २.४८ |
| १४ | पी-१४ | श्री.मुरलीधर वाधवानी, श्री.राम वाधवानी व श्री.श्याम वाधवानी | १३३ | सायकी | २.२५ |
| १५ | पी-१५ | श्री.मुरलीधर वाधवानी, श्री.राम वाधवानी व श्री.श्याम वाधवानी | १३१, १३२ | सायकी | २.६५ |
| १६ | पी-१६ | मे.बेस्टोन मिनरल्स व प्रीकास्ट सोलुशन तर्फे दिनेश चंदनमल पगारीया | ३७, ४० | मासलकुंड | ६.५८ |
| **एकुण प्रस्तावित क्षेत्र** | | | **५९.० हेक्टर (प्रस्तावित १६ खदानीचे क्षेत्र)** | | |
| **जमिनीचा प्रकार** | | | खाजगी मालकीची जमीन | | |
| **तालुका व जिल्हा** | | | उमरेड तालुका, नागपूर जिल्हा, महाराष्ट्र | | |

प्रस्तावीत प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २९/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कान्हा इम्पेरियल रिसॉर्ट, उटी, उमरेड रोड, नायरा पेट्रोल पंम्पच्या मागे, व्हीआयटी कॉलेज जवळ, नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर ह्या म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या म्हणून उपस्थित होत्या व श्री. सुशिलकुमार राठोड, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले व अध्यक्षांच्या संमतीने सकाळी ११.०० वाजता पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या नागरीकांच्या नावांची यादी सोबत जोडली आहे. **(सहपत्र-१).**

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा.अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी प्रकल्पाला परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी अथवा लेखी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाची अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे असे नमुद केले. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २७/०३/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे असे कळविले. वृत्तपत्रांत प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२).**

भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तसेच प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या संक्षिप्त अहवाल (इंग्रजी व मराठी मध्ये) व इतर माहिती असलेले कागदपत्रे विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात ३० दिवसापूर्वी नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत एकही निवेदन म.प्र.नि.मंडळाकडे प्राप्त झालेले नाही. मंडळाचा आदेश क्र. ई-२५/२०२५ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-250403-FTS-0273 dtd. 03/04/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे **(सहपत्र-३)**. जनसुनावणी पुर्वी म.प्र.नि.मंडळाला एकही निवेदन प्राप्त झाले नाही. तथापी, जनसुनावणी दरम्यान ६३ निवेदने प्राप्त झाली **(सहपत्र-४).**

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार मराठी भाषेत १) श्री मणिराम यादव, मौजा हळदगाव (७.५० हेक्टर) २) श्री अजय जेसवानी , मौजा हळदगाव (३.१५ हेक्टर) ३) श्री संजय तिडके, श्रीमती कविता तिडके व श्रीमती ज्योती तिडके, मौजा हळदगाव (३.५१ हेक्टर) ४) श्री संजय तिडके, श्रीमती कविता तिडके, मौजा हळदगाव (३.६३ हेक्टर) ५) श्री दिलीप मधुकर सांबारे, मौजा हळदगाव (२.८५ हेक्टर) ६) श्री विशाल अजय जेस्वानी श्री संदेश जेस्वानी व श्रीमती कनक जेस्वानी, मौजा हळदगाव (४.२५ हेक्टर)

..३/-

७) श्री मयूर रामभाऊ मुसळे, मौजा उटी (४.९२ हेक्टर) ८) श्री अमोल प्रभाकर पिलारे, मौजा पारडगाव (४.४७ हेक्टर) ९) श्री अश्विन मेहता व श्री अरविंद मेहता, मौजा पारडगाव (४.०० हेक्टर)१०) श्री तेजिंदरसिंग महेंदरसिंग जस्सल, मौजा मासलकुंड (१.३० हेक्टर) ११) श्रीमती प्रतिभा किशोर कान्हेरे, मौजा मासलकुंड (१.७६ हेक्टर) १२) श्री राहुल मणिराम यादव, मौजा परसोडी (३.७० हेक्टर) १३) श्री राहुल मणिराम यादव, मौजा परसोडी (२.४८ हेक्टर) १४) श्री मुरलीधर वाधवानी, श्री राम वाधवानी व श्री श्याम वाधवानी मौजा सायकी (२.२५ हेक्टर) १५) श्री मुरलीधर वाधवानी, श्री राम वाधवानी व श्री श्याम वाधवानी मौजा सायकी (२.६५ हेक्टर) १६) मे. बेस्टोन मिनरल्स आणि प्रीकास्ट सोल्युशन्स तर्फे श्री दिनेश चंदनमल पगारिया, मौजा मासलकुंड (६.५८ हेक्टर) येथील १६ प्रस्तावित दगड खाणीचे सादरीकरण केले. पर्यावरण विषयक बाबींबाबत प्रकल्प परिसर, प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ, प्रस्तावित सुविधा, अग्निशामक सुविधा, प्रक्रियेचे विवरण, वातावरणाची माहिती आणि अपेक्षित परिणामांची पडताळणी, जमिनीवरील घटक, वातावरण व हवामान, हवेतील घटक, परिसरातील हवेचा दर्जा, आपत्ती व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषणाचे स्त्रोत, ध्वनी घटक, जल घटक, उपलब्ध पाण्याचा दर्जा, पाण्याचा वापर, सांडपाण्याची निर्मिती, जैविक घटक, सामाजिक आणि आर्थिक घटक, स्थानिक मूलभूत सोयीसुविधांवर होणारा परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवेतील उत्सर्जन, सांडपाणी व्यवस्थापन, वनीकरण कार्यक्रम, आपत्ती व्यवस्थापन आणि परिक्षण या बाबींवर सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-२ यांनी उपस्थितांना सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्यास त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री.अमोल चव्हाण, म्हसाळा, ता.उमरेड, जि.नागपुर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | भिवापूर (उटी) या गावाच्या सभोवताली २०० ते ३०० मीटर अंतरावर क्रशर युनिट्स असून हे ५०० मीटरपेक्षा जास्त असलेच पाहिजे. रस्त्याला लागुनच क्रशर युनिट्स चालत आहेत, या क्रशर युनिट्स धारकांना परवानगी कशी मिळते? | भिवापूर (उटी) या गावाच्या हद्दीत कोणताही प्रस्तावित प्रकल्प नाही व १६ प्रस्तावित प्रकल्प हे भिवापूर (उटी) या गावाच्या हद्दीपासून १.०० कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर आहेत. |
| २ | गावातील रस्त्याची क्षमता १२ टन असून या रस्त्यावर ४० टन क्षमतेचे ट्रक चालतात, त्यामुळे रस्त्याची स्थिती फार खराब झालेली आहे. | प्रस्तावित प्रकल्पामध्ये कोणत्याही ग्रामीण रस्त्यांचा वापर होणार नाही. प्रस्तावित खदानीपासुन MDR पर्यंतचा रस्ता WBM या प्रकारच्या बांधणीचा नियोजीत असून त्याबाबतचा खर्च EMP मध्ये नमुद आहे.<br><br>MDR (चाम्पा ते सायकी / सायकी-पारडगाव), राज्य महामार्ग (मकरधोकरा ते बुटीबोरी) व राष्ट्रीय महामार्ग (उमरेड-नागपुर) हे रस्ते वापरण्यात येणार आहेत. |
| ३ | वाहतूक करणाऱ्या ट्रकांचा वेग अधिक असतो, त्यामुळे रस्त्यावरील धूळ अधिक प्रमाणात उडते, या रस्त्याने ये-जा करणाऱ्या शाळकरी मुलांचे गणवेश रस्त्यावरील उडणाऱ्या धुळी मुळे खराब होतात. तसेच वेगाने चालणाऱ्या ट्रक्समुळे शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. | |

| | | |
|---|---|---|
| ४ | स्टोन क्रशर युनिट्स मध्ये स्टोन क्रशिंग चालू असतांना पाण्याची फवारणी करीत नाही, जमिनीवर पाणी शिंपडत नाही, झाडे लावत नाही. २४ तास क्रशर चालवतात, क्रशर २४ तास चालवण्याची परवानगी असते काय? | प्रस्तावित खदानी फक्त सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.०० (असे दिवसा १२ तास) कार्य मर्यादा निश्चित केलेली आहे. |
| ५ | गावापासून व रस्त्यापासून स्टोन क्रशर युनिट्स व खदानी किती अंतरावर असावे. | प्रस्तावित १६ प्रकल्प हे खाण कायदा, १९५२, (Mines Act १९५२), महाराष्ट्र गौण खनिज अधिनियम -२०१३ (Maharashtra Minor Mineral Extraction rules, २०१३), व MPCB च्या दिनांक ०३/०८/२०२० च्या Siting Criteria for Stone Quarries in the State of Maharashtra च्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरून आहेत. |

**२) श्री. सिकंदर पवार, चाम्पा, ता.उमरेड, जि.नागपुर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | उटी या गावात स्टोन क्रशरपासून उडणाऱ्या धुळीचे प्रमाण खूप जास्त आहे.<br><br>धुळी मुळे शेतातल्या पिकांचे नुकसान होत आहे, जेव्हा पेरणी सुरु होते त्या नंतर रोपावर धूळ जमा होते, त्यामुळे उत्पादन होत नाही. परवानगी मध्ये दिलेल्या अटी व शर्तीचे पालन झाले पाहिजे.<br><br>सद्यस्थितीत सुरु असलेल्या किती खदान धारकांनी वृक्षारोपण/ झाडे लावलेली आहे? किती मुरूम दगड खाणी ला फेन्सिंग आहे? इथे फेन्सिंग नसलेल्या दगडखानींवर प्रशासनाने लक्ष दयावे व हवा, जल, ध्वनी प्रदूषण कसे संतुलित राहील या कडे विभागाने लक्ष द्यावे. | उपस्थित केलेले प्रश्न हे सद्यस्थितीत सुरु असलेल्या दगडखाणीवर आहे. प्रशासनाने सद्यस्थितीत सुरु असलेल्या काही स्टोन क्रशरवर कारवाई केलेली आहे. पुढे देखील जे स्टोन क्रशर संमतीपत्रातील अटी व शर्तीचे पालन करणार नाहीत अशा स्टोन क्रशरवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे प्रादेशिक अधिकारी श्रीमती हेमा देशपांडे यांनी सांगितले. |

**३) श्री.सुनिल पोहनकर, सरपंच, ग्रा.पं.हळदगांव, ता.उमरेड,जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | चाम्पा, हळदगाव परसोडी हा रोड अत्यंत खराब आहे, पांढरा शर्ट सुद्धा घालू शकत नाही. खदान धारक तात्पुरता रोड ची डागडूजी करतात परंतु तुम्हाला विनंती आहे आम्हाला रोड साठी तरतुद करावी. | प्रकल्प धारक, यांनी सांगितले कि, सद्यस्थितीत चाम्पा हळदगाव परसोडी (MDR) ह्या रस्त्यांची स्थिती फार खराब आहे, ही वस्तुस्थिती आहे व या क्षेत्रातील खदान धारक रस्त्यावर गिट्टी टाकून रस्त्यांची डागडुजी करतात परंतु ते पुरेशी नाही. या रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण करिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे. |

**४) श्री. शंकर विठ्ठलराव हाते, हळदगांव, ता.उमरेड, जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | हळदगाव-सायकी हा रोड सिमेंट रोड होणे आवश्यक आहे, वेळोवेळी पाणी मारत राहावे, खदानी पासून रोजगार मिळाला आहे, कुंपण करणे आवश्यक आहे झाडे लावणे आवश्यक आहे. ही सर्व कामे प्रकल्पधारकांनी करायला पाहिजे. | प्रस्तावित १६ प्रकल्पाच्या कार्यकारी सारांशामध्ये एकूण २७१०१ झाडे व याकरिता ८१,३०,३००/- रुपयाची तरतूद केलेली आहे. प्रत्येक खदानी सभोवताल तारेचे कुंपणाकरीता रू. ३२ लक्षची तरतूद केलेली आहे. प्रस्तावित प्रकल्पांमुळे ३५१ प्रत्यक्ष व २३३ अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल. क्षेत्रातील युवकांना प्राधान्य देण्यात येईल. |

**५) श्री. पुष्कर बुटी रा. नागपूर (चाम्पा येथील शेतकरी), जि.नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | माझी शेती चाम्पा येथे असून शेतामध्ये ६००० संत्र्याची झाडे आहेत. चाम्पा-हळदगांव या रोड वर होणाऱ्या धुळी मुळे मला गेल्या ४ वर्षां पासून एकही रुपया चे उत्पादन झालेले नाही. या अगोदर मला वार्षिक ४० लाख रुपयांचे उत्पादन व्हायचे. ट्रक चालक टोल वाचविण्याकरिता पारडगाव रोडने न जाता चाम्पा हळदगाव रोड ने ३० टन ते ४० टन क्षमतेचे ट्रक लोड घेऊन चालतात, रोड वर बैरीकेड लावायला पाहिजे. | चाम्पा-हळदगाव परसोडी (MDR) ह्या रस्त्याची स्थिती फार खराब आहे, रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण झाल्यावर धुळीचे प्रमाण कमी होईल. तो पर्यंत दररोज रस्त्यावर पाणी शिंपडण्यात येईल.<br><br>ट्रक चालकांचे परिसंवाद / प्रशिक्षण घेवून ओवेरलोडिंग चे नुकसान, वेग मर्यादेचे पालन व चिन्हांकित केलेल्या मार्गाचे अनुसरण करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येइल. या बाबत EMP मध्ये तरतूद करण्यात येईल. |

**६) श्री आशिष पवार, माजी सरपंच गट ग्राम पंचायत चाम्पा, ता.उमरेड, जि.नागपुर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | चाम्पा-हळदगांव रोड ची स्थिती अतिशय खराब असूंन गावातील मुले चाम्पा येथे शाळेमध्ये पायदळ जातात तेव्हा त्यांचे पूर्ण गणवेश खराब होतात हि इथली एक मोठी समस्या आहे. येथील खदान धारक नियमाचे पालन करतांना दिसून येत नाही. या भागातून शासनाला भरपूर प्रमाणात महसूल मिळतो, त्याची परत फेड म्हणून गावाला काही मिळाले पाहिजे ते मिळत नाही.<br><br>सिमेंट रोड होणे आवश्यक आहे, जेणे करून समस्या सुटेल, खदान धारक नियमितपणे पाणी शिंपडत नाहीत, परसोडी हळदगाव रोड ने ये जा करतात, त्यांना पर्यायी रस्ता देण्यात यावा, या परिसरात धुळी मुळे पर्यावरण खराब झालेले आहे. खनिज निधी मधून शेतीची भरपाई देण्यात यावी. | चाम्पा-हळदगाव परसोडी (MDR) ह्या रस्त्याची स्थिती फार खराब आहे, रस्त्याचे कॉन्क्रीटीकरण झाल्यावर धुळीचे प्रमाण कमी होईल. तो पर्यंत दररोज रस्त्यावर पाणी शिंपडण्यात येईल.<br><br>ट्रक चालकांचे परिसंवाद/प्रशिक्षण घेवून ओवेरलोडिंग चे नुकसान, वेग मर्यादेचे पालन व चिन्हांकित केलेल्या मार्गाचे अनुसरण करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येइल. या बाबत EMP मध्ये तरतूद करण्यात येईल.<br><br>प्रस्तावित १६ प्रकल्पांपैकी फक्त ७ प्रकल्पाची दळण-वळण चाम्पा ते हळदगाव MDR या मार्गाने प्रस्तावित आहे. |

७) श्रीमती. मनीषा मोंगसे, रा.उटी, ता.उमरेड, जि.नागपुर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | खदान धारक रोड वर पाणी शिंपडत नाहीत. खदान धारकांना पर्यायी रस्ता द्यावा, खदान धारकं CSR निधी गावाला देत नाहीत.<br><br>ट्रक वाहतुकीचा खूप त्रास असून चालक नागरीकांशी गैरवर्तणुक करतात. याकडे विभागाने लक्ष दयावे. | स्टोन क्रशर व रस्त्या मुळे होणाऱ्या धुळीला आटोक्यात आणण्याकरिता उपायोजना बनवून उटी क्लस्टर माइन ओनर्स असोसिएशन द्वारे राबविण्यात येईल व याची EMP मध्ये खर्चासाठी आर्थिक तरतूद करण्यात येईल.<br>ट्रक चालकांचे परिसंवाद/प्रशिक्षण देवून ओवेरलोडिंग चे नुकसान, वेग मर्यादेचे पालन व चिन्हांकित केलेल्या मार्गाचे अनुसरण करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येईल. या बाबत EMP मध्ये तरतूद केली जाईल. |

८) श्रीमती. वैशाली साडमाके, सरपंच, ग्रा.पं.उटी, ता.उमरेड, जि.नागपुर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाहतुकीमुळे धुळीचा खुप त्रास असून रस्त्यावर पाणी शिंपडत नाहीत. त्यामुळे रोड खराब झालेला आहे. या बाबीवर विभागाने लक्ष देवून मदत करावी. | स्टोन क्रशर व रस्त्या मुळे होणाऱ्या धुळीला आटोक्यात आणण्याकरिता उपायोजना बनवून उटी क्लस्टर माइन असोसिएशन द्वारे राबविण्यात येईल व याची EMP मध्ये खर्चासाठी आर्थिक तरतूद करण्यात येईल. |

९) श्री. चंद्रशेखर नरुले, रा. भिवापूर ता.उमरेड, जि.नागपुर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाहतुकीचा टोल नाका वाचविण्याकरीता ट्रक कोणत्याही मार्गाने व पादंण रस्त्यावरून वाहतुक करतात. वाहतुकीकरीता गावाबाहेरून पर्यायी रस्ता देण्यात यावा. | ट्रक चालकांचे परिसंवाद / प्रशिक्षण घेवून ओवेरलोडिंग चे नुकसान, वेग मर्यादेचे पालन व चिन्हांकित केलेल्यामार्गाचे अनुसरण करण्याबाबतचे प्रशिक्षण देण्यात येइल. या बाबत EMP मध्ये तरतूद केली जाईल. |

१०) श्री. सुखराम लाजुरकर, रा. सायकी, ता.उमरेड, जि.नागपुर.

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | चाम्पा ते सायकी रोड खूप खराब असून क्षमतेपेक्षा जास्त ट्रक चालतात. ज्या वेळी स्टोन क्रशर सुरु असते त्यावेळी हवेत धुळाचा थर दिसून येतो. शेती बाजूला असून झाडाच्या पानावर धूळ बसते, त्यामुळे उत्पादन होत नाही. ब्लास्टिंगच्या वेळी गावास हादरे बसतात. | स्टोन क्रशर व रस्त्या मुळे होणाऱ्या धुळीला आटोक्यात आणण्याकरिता उपरोक्त नमूद उपायोजना राबविण्यात येतील.<br><br>प्रस्तावित १६ प्रकल्पांपैकी ३ प्रकल्प हे ब्लास्टिंग विना (रॉक ब्रेकर चा वापर करून उत्खनन) व १३ प्रस्तावित प्रकल्पांमध्ये संयमित ब्लास्टिंग (कंट्रोल ब्लास्टिंग प्रणाली) चा वापर करण्यात येणार आहे. यंत्राद्वारे ब्लास्टिंगद्वारे होणारे कंपन मोजल्या जातील तसेच खाण सुरक्षा संचालक (DGMS) यांची परवानगी नंतरच खानीची सुरवात केली जाईल. |

**११) श्रीमती रेखा धोटे सरपंच, परसोडी, ता.उमरेड, जि.नागपुर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | परसोडी गावातून खुप ट्रक चालतात त्यामुळे प्रदूषण होते व धुळी मुळे रोड वरून जाताना काहीच दिसत नाही. खदान धारकांना ३ वेळा पाण्याची फवारणी करायला पाहिजे पण ते एकदाच पाण्याची फवारणी करतात. रस्त्यावर खड्डे पडलेले असून त्यामध्ये पाणी साचुन राहते व वाहनांच्या वाहतुकीमुळे गावकऱ्यांना खुप त्रास होतो. खदान धारकांनी रस्त्यावरील खड्डे बुजवावे. | स्टोन क्रशर व रस्त्या मुळे होणाऱ्या धुळीला आटोक्यात आणण्याकरिता उपरोक्त नमूद उपाययोजना राबविण्यात येतील.<br><br>उटी क्लस्टर माइन ओनर्स असोसिएशन द्वारे रस्त्याचे दुरुस्ती चे काम राबविण्यात येईल व याची EMP मध्ये आवर्ती खर्चासाठी (recurring expenses) आर्थिक तरतूद करण्यात येईल. |

**१२) श्री. रामभाऊ चंपतराव धोटे, हळदगाव, ता.उमरेड, जि.नागपुर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | मी वसंतराव शिरभाते यांचा दिवाणजी असून त्यांच्या शेतामध्ये राहतो. धुळीमुळे शेतातील कापूस काळा पडतो व भाव मिळत नाही.<br>कापूस, तूर, भाजीपाला यावर धुळीमुळे काळपट पणा येतो, झाडाची वाढ होत नाही, पिकाला भाव मिळत नाही, धुळीचा त्रास बंद व्हावा. | स्टोन क्रशर व रस्त्या मुळे होणाऱ्या धुरीला आटोक्यात आणण्याकरिता उपरोक्त नमूद उपाययोजना राबविण्यात येतील. |

**१३) श्री. जीवन धोटे, सायकी, हळदगाव, ता.उमरेड, जि.नागपुर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रस्त्याच्या धुळीचा खूप त्रास आहे, कापूस काळा पडतो. | स्टोन क्रशर व रस्त्या मुळे होणाऱ्या धुरीला आटोक्यात आणण्याकरिता उपरोक्त नमूद उपाययोजना राबविण्यात येतील. |

**१४) श्री. सचिन तुळसकर, उमरेड, ता.उमरेड, जि.नागपुर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | उमरेड MIDC मध्ये टायर जाळण्याच्या कंपन्या मुळे धूर होतो. तुम्ही त्या वर ठोस कारवाई करायला पाहिजे. | यावर श्रीमती हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर यांनी सांगितले की हा प्रश्न प्रस्तावित जनसुनावणी संबधित नसुन या बाबत म.प्र.नि. मंडळास लेखी निवेदने दयावे. |

अध्यक्ष, लोकसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांनी उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली याबाबत आभार प्रकट केले व उपस्थित केलेल्या मुद्द्यांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेवून शासनास सादर करण्यात येईल. तसेच जर कुणाच्या लेखी नोंदी असतील त्यांनी समितीकडे जमा करणे किंवा दि.३०/०४/२०२५ पर्यंत म.प्र.नि.मंडळ, कार्यालय, नागपूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे जमा करण्याबाबत सुचित केले. तसेच उपस्थित जनतेचे आभार मानले. त्यानंतर सदर पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(सुशिलकुमार राठोड)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-२

(अनुप खांडे)
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर